**खटला क्र. ५२५/पीडब्ल्यु/२०२३** **निशाणी क्र. ३८ क्रमशः**

साक्षीदार क्र. १ शपथेवर सुरू:—

**पुढील सरतपासणी सरकारी वकील श्री. रविंद्र पाटील :—**

५. मी आरोपींना जे अनुक्रमे रू. १,००,०००/—, रू. १,५०,०००/— आणि रू. १,००,०००/— असे एकूण रक्कम रू. ३,५०,०००/— चे धनादेश दिले होते. ते धनादेश माझे खाते असलेली बँक

अपना सहकारी बँक लिमिटेड, गोरेगाव, दिंडोशी शाखा, मुंबई येथील होते. या अगोदर देखील मी सदरील व्यवहाराबाबत आरोपींना जे धनादेश दिले होते ते याच बँकेचे होते. मला आता माझ्या बँकेचे पत्र व बँकेचा माझ्या खात्याचा खातेउतारा दाखविण्यात आला. तो खाते उतारा तोच आहे. तो खाते उतारा **निशाणी ४१** वर आहे.

६. त्यानंतर मी आरोपींकडे नाव लावण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी आज होईल उद्या होईल असे कारण दिले. मी त्यानंतर वेळोवेळी विचारणा केल्यानंतर नाव लावण्यासाठी पुन्हा रू. ५,००,०००/— लागतील असे संजय कांबळे व संदिप सुर्वे यांनी सांगितले. मी आरोपींकडे दस्तावेजांची मागणी केली असता ते दस्तावेज हे खाजगी असल्याने ते देता येणार नाहीत अशी सबब मला संजय कांबळे आणि संदिप सुर्वे यांनी सांगितली होती. त्यानंतर मी संदिप सुर्वे यास संजय कांबळे याच्यामार्फत रोख रू. ५,००,०००/— श्री. चंद्रकांत चव्हाण यांना दिले होते. सदरील रक्कम देताना माझी पत्नी, साडु अजय पवार, मृणाल अजय पवार व प्रसन्ना कुळे हे हजर होते.

७. आरोपींनी माझ्याकडुन रू. ५,००,०००/— स्विकारल्यानंतर देखील सहा महिन्याचा कालावधी पुढे ढकलत नेला. मी त्यानंतर आरोपींकडे कागदपत्रांबाबत चौकशी केली असता त्यांनी मला माझे कागदपत्र हे मुंबई महानगरपालिकेमध्ये जमा केलेले आहेत असे सांगुन कोरोनामुळे ते पाहता येणार नाहीत अशी सबब सांगितली. त्यानंतर कोरोनाचा प्रादुर्भाव संपल्यानंतर मी पुन्हा आरोपींना भेटलो होतो. त्यानंतर देखील त्यांनी कोरोनाचा प्रादुर्भाव संपला असल्याने काम लवकर होईल असे सांगुन जवळपास सहा महिन्यांचा कालावधी घालवला. मी ज्यावेळेस आरोपींकडे पाठपुरावा केला होता त्यावेळेस आरोपींनी मला सन २०१७ मध्ये व्यवहाराच्या बाबतीत रू. १००/— च्या स्टॅम्पपेपवर प्रतिज्ञापत्र करून दिले होते. तसेच पैसे स्विकारल्याबाबतच्या पावत्या व सुरक्षेसाठी रू. १५,००,०००/— जे दोन धनादेश मला दिले होते. मला आता वर्णन यादी निशाणी ४० च्या अनुक्रमांक

१ वर दाखल असलेला रू. १००/— चा मुद्रांक पेपर ज्यावर प्रतिज्ञापत्र असा मथळा लिहिलेला आहे ते दाखविण्यात आले. ते प्रतिज्ञापत्र संजय कांबळे याने करून दिले होते. त्या प्रतिज्ञापत्रावर साक्षीदार म्हणुन संदिप सुर्वे यांनी स्वाक्षरी केलेली आहे. ते प्रतिज्ञापत्र मला देण्यात आले होते. त्याची मुळ प्रत माझ्याकडे उपलब्ध असुन त्याची साक्षांकित प्रत मी न्यायालयात दाखल केलेली आहे. ती प्रत मला आता दाखविण्यात आली. ते प्रतिज्ञापत्र माझ्या ताब्यात देण्यात आले होते त्यामुळे त्याबाबतची मला माहिती आहे. सदरील प्रतिज्ञापत्र हे **निशाणी ४२** वर आहे. आरोपी संजय कांबळे, संजिवनी कांबळे व संदिप सुर्वे यांनी रू. ३५,००,०००/— व रू. १०,००,०००/— स्विकारल्याबाबतच्या स्वतंत्र पावत्या करून दिल्या होत्या. त्या मुळ पावत्या माझ्या ताब्यात असुन त्याच्या साक्षांकित प्रती मी न्यायालयात दाखल केल्या आहेत. त्या वर्णनयादी **निशाणी ४०** च्या अनुक्रमांक २ वर दाखल असून त्या पावत्यांच्या साक्षांकित प्रती मला आता दाखविण्यात आल्या. त्यावर तिन्हीही आरोपींच्या व माझी स्वाक्षरी नमुद आहे. सदरील पावत्या अनुक्रमे **निशाणी ४३ व ४४** वर दाखल आहेत. मला आता वर्णनयादी **निशाणी ४०** च्या अनुक्रमांक ३ वर दाखल असलेले प्रत्येकी रू. १५,००,०००/— चे दोन धनादेशाच्या साक्षांकित प्रती दाखविण्यात आल्या. ते मुळ धनादेश माझ्या ताब्यात आहेत. त्यावर आरोपी संजिवनी कांबळे हिची स्वाक्षरी नमुद आहे. ते धनादेश माझ्या नावे लिहुन दिले होते त्यामुळे ते माझ्या ताब्यात आहेत. सदरील धनादेशाच्या साक्षांकित प्रती या अनुक्रमे **निशाणी ४५ व ४६** वर आहेत.

८. माझ्यात व आरोपीमध्ये झालेल्या व्यवहारानंतर माझ्या साडुचा मामेभाऊ इंद्रजित राऊळ याच्या बाबतीत देखील फसवणुकीची घटना घडली होती. ती फसवणुक आरोपी संजय कांबळे, संजिवनी कांबळे, संदिप सुर्वे व चंद्रकांत चव्हाण यांनी केली होती. माझ्याप्रमाणेच इंद्रजित राऊळ यांना देखील सदरील आरोपींनी माझ्यासारखेच प्रतिज्ञापत्र व पावत्या करून दिल्या होत्या. इंद्रजित राऊळ याचा आरोपीशी झालेला व्यवहार हा रू. २३,००,०००/— चा होता. इंद्रजित राऊळ याने आरोपींना संपुर्ण रू. २३,००,०००/— दिली होती.

९. मी व इंद्रजित राऊळ अश्या दोघांनी मिळुन आरोपींना अनुक्रमे रू. ३५,००,०००/— व रू. २३,००,०००/— देवून देखील आमचे काम होत नाही म्हणुन एफ साऊथ कार्यालय, परेल येथे भेट दिली होती. त्या ठिकाणी चौकशी केली असता आरोपी संजय कांबळे हा दिर्घ रजेवर गेला असल्याची माहिती आम्हाला समजली होती. आम्ही त्या ठिकाणी चौकशी केली असता माझे व इंद्रजितचे नाव सदरील कार्यालयाच्या अभिलेखामध्ये कुठेही दिसले नाही. आरोपींनी माझी व इंद्रजित राऊळची फसवणुक केल्याचे आमच्या लक्षात आले.

१०. त्यानंतर आरोपी संदिप सुर्वे याने मला जीपे द्वारे रू. ९५,०००/— व इंद्रजित राऊळ यास रू. १,००,०००/— पाठवले होते. त्यानंतर आरोपींनी जसे अभिवचन दिले होते त्याप्रमाणे ते वागले नाहीत व त्यांनी आमची फसवणुक केली म्हणुन मी दिनांक २१/१०/२०२२ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दादर पोलीस स्टेशन येथे अर्ज दाखल केला होता. आता मला माझा तो अर्ज दाखविण्यात आला. त्यावर माझी स्वाक्षरी नमुद असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो अर्ज **निशाणी ४७** वर आहे. माझ्या सदरील अर्जाची चौकशी करून पोलीसांनी मला दिनांक ३१/०१/२०२३ रोजी पोलीस स्टेशनला बोलावून माझा फिर्यादी जबाब नोंदवला होता. तो फिर्यादी जबाब मला आता दाखविण्यात आला. त्यावर माझी स्वाक्षरी नमुद असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. फिर्यादी जबाब हा **निशाणी ४८** वर आहे. माझ्या सदरील जबाबाच्या आधारे पोलीसांनी आरोपींविरूद्ध गुन्हा नोंदवला होता. मला आता प्रथम खबरी अहवालाची प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी स्वाक्षरी नमुद असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. प्रथम खबरी अहवालाची प्रत ही **निशाणी ४९** वर आहे. मी आरोपींना ओळखतो. आज आरोंपीपैकी संदिप सुर्वे, संजिवनी कांबळे व चंद्रकांत चव्हाण हे उपस्थित आहेत. आरोपी संजय कांबळे हा न्यायालयासमोर उपस्थित नाही.

उलटतपासणी ॲड. श्री. श्रावण शुक्ला आरोपी क्र. १ व ३ करिता :—

न्यायालयाची दुसऱ्या सत्राची कार्यालयीन वेळ संपल्यामुळे उलटतपास बचाव पक्षाचे विधीज्ञ यांच्या विनंतीवरून दिनांक २१/०८/२०२४ पर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरी/—

(वैभव व. कुलकर्णी)

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

५ वे न्यायालय, दादर, मुंबई.

दिनांक : १६/०८/२०२४.